क्रमांक : मपोअ/सीबी-2/ प्रशिक्षण विभाग झेरॉक्स मशिन AMC/2025 नाशिक 860 दिनांक:- / /2025 27 JAN 2025

**विषय** :- महाराष्ट्र पोलीस ॲकेडमी नाशिक येथिल प्रशिक्षण शाखेतील कॅनॉन iR2725 चे सन 2025-26 करिता वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार करणेबाबत

---00---

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविणेत येते की, महाराष्ट्र पोलीस ॲकेडमी, नाशिक येथिल प्रशिक्षण शाखेतील कॅनॉन iR2725 चे सन 2025-26 करिता (माहे फेब्रुवारी 2025 ते जानेवारी 2026) करिता वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार खालील अटींनुसार करावयाचा आहे.:-

1) दरमहा सदर मशिनची रुटीन सर्व्हिसिंग करणे, टोनर आवश्यकनेनुसार रिफिल करणे.
2) नादुरुस्त इलेक्ट्रिक पार्ट तातडीचे बदलणे आवश्यक राहिल.
3) मशिनमध्ये अचानक काही बिघाड झाल्यास तात्काळ दुरुस्त करणे बंधनकारक राहील
4) देयक वर्षातुन दोन टप्यात-6 महिने कालावधीने मंजुर करण्यात येईल.
5) आपली सेवा (वार्षिक करार) कोणत्याही टप्यावर नाकारण्याचे सर्वाधिकार मा.संचालक, मपोअ. नाशिक यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे.
6) सदर देयकाची रक्कम आपल्याला CMP व्दारे आदा करण्यात येणार असल्याने पुरवठादाराचे पॅनकार्ड झेराक्स प्रत व बँकेचा Cancel Cheque देयकासोबत सादर करण्यात यावा.
7) सदर माहिती अभावी आपल्याला देयकाचे प्रदान करण्यास विलंब झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.
8) आवश्यकतेनुसार आपण सेवा तात्काळ देणे आवश्यक असून त्यामध्ये कुठल्याही प्रकारचा विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
9) वार्षिक करारामध्ये नमूद केल्यानुसार सर्व्हिसिंग केल्याबाबतचे Job Cards, ठेवण्यात येवुन वरिष्ठांनी वेळोवेळी मागणी केल्यास तात्काळ सादर करणे बंधनकारक राहील.

महाराष्ट्र शासन उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक 01 डिसेंबर 2016 मधील तरतुदीनुसार तसेच **या कार्यालयाचे परिपत्रक आदेश क्रमांक सीबी-2/मपोअ/खरेदी बाबत/6941, दिनांक 06/09/2024 अन्वये** निर्गमीत करण्यात आलेले परिपत्रकामध्ये नमूद अटी व शर्तीनुसार वेगवेगळे स्थानिक पुरवठादारांचे किमान तीन सिलबंद दरपत्रक Pan Card, **विक्री व सेवाकर नोंदणी, दुकान परवाना** इत्यादी नमूद कागदपत्रासह पुढील कार्यवाही करिता तात्काळ कार्यालयास सादर करण्यात यावी. जेणे करुन पुढील कार्यवाही वेळेत करणे उचित होईल.

मा. संचालक
यांचे मान्यतेने

( डॉ. काकासाहेब डोळे )
उपसंचालक, (प्रशासन)
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

**प्रति,**

श्री.संतोष खडके,पोलीस निरीक्षक ,मपोअ, नाशिक

2/- उपरोक्त कामी एक पोलीस कर्मचारी यांची नेमणुक करुन वर नमूद अटी व शर्ती नुसार स्थानिक बाजारातुन किमान तीन वेगवेगळे (स्वतंत्र) पुरवठादार यांचेकडुन सिलबंद दरपत्रक प्राप्त करुन कार्यालयास पुढील कार्यवाही करिता तात्काळ सादर करण्यात यावे.

**प्रत,**

सहा.संचालक, (आय.टी.विभाग) मपोअ. नाशिक

2/- उपरोक्त नमूद केल्यानुसार आवश्यक दरपत्रक मागविणे करिता सदरचा आदेश MPA संकेत स्थळावर प्रसारित करण्याबाबत आय.टी.विभागातील संगणक तज्ञ यांना सुचित करावे.

नोटीस बोर्ड,(सर्व) मपोअ. नाशिक

POP nivida adesh/pop 122/patole new

Scanned with OKEN Scanner